# भारत शिक्षण संस्थेचे
# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

**माकणी, ता. लोहारा जि. उस्मानाबाद**

*NAAC Accredited : "B" Grade*

संलग्नित - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद



# माहिती पुस्तिका

**2022-23**

## ● उत्पत्ती (Genesis) ●

भारत शिक्षण संस्थेची स्थापना स्वातंत्र्यपुर्व काळात सन १९४१ साली राष्ट्रीय जनजागृतीच्या हेतूने झाली. कै. तात्यारावजी मोरे आणि त्यांच्या सहकार्यानी प्रयत्नांची पराकाष्ठा करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संस्था उभी केली. तदनंतर आजपावेतो संस्थेची प्रगती सातत्याने होत आली आहे. जुलै १९९९ साली भारत शिक्षण संस्थेने माकणी, ता.लोहारा येथे वरिष्ठ कला महाविद्यालयाची स्थापना करून उच्च शिक्षणाची गंगा ग्रामिण भागापर्यंत पोचविली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून प्रगतीपर्यंत तत्कालीन अध्यक्ष कै.श्रीधररावजी मोरे प्रयत्नशील होते. त्यानंतर संस्थेने या भागातील विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शिक्षणाची निकड जाणून शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पासून विज्ञान शाखा व २०१०-२०११ पासून वाणिज्य शाखा सुरू केली. संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष कै.शिवाजीराव मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विज्ञान शाखा व वाणिज्य शाखा सुरू करण्यात आल्या. आज या महाविद्यालयातून शेकडो विद्यार्थी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेचे शिक्षण घेत आहेत.



ISO 21001:2018

PARAMOUNT QUALITY CERTIFICATIONS

Certificate of Registration

This is to certify that the Management System of

**BHARAT SHIKSHAN SANSTHA'S ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE**

MAKANI, TQ. LOHARA, DIST. OSMANABAD, MAHARASHTRA - 413604, INDIA

has been independently assessed by PQC and found to comply with the requirements of

**ISO 21001:2018**

**(Educational Organizations Management System)**

**Certification Scope:**

**PROVIDING BACHELORS DEGREE IN B.A., B.Sc., B.Com. AND B.Voc.**

**Certification Calendar:**

Client Id: 9431

Certificate No: INEO/MH -10696/0522

Registered on: 31.05.2022

Issued on: 31.05.2022

Expires on: 30.05.2025

1st Surveillance on/before: 30.05.2023

2nd Surveillance on/before: 30.05.2024

ISO 21001:2018 CERTIFIED

CERTIFIED

ACCREDITED Management System Certification

Authorized Signatory

PARAMOUNT QUALITY CERTIFICATIONS

27, Old Gloucester Street, London, WC1N 3AX, United Kingdom. Email:- info@pqcert.in

Validity of this certificate is subject to successful completion of surveillance audit on or before of due date.

(In case surveillance audit is not allowed to be conducted, this certificate shall be suspended/withdrawal.)

Certification Verification: Please check this validity of the certificate at:- https://pqcert.in/certified-clients/ or www.pqcert.in at Certified Client

This Certificate remains the property of PQC & shall be returned immediately upon request.

www.pqcert.in

# भारत शिक्षण संस्था, उमरगा जि. उस्मानाबाद

## कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | संपूर्ण नाव व पत्ता | पद | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | **श्री. अमोल शिवाजीराव मोरे**<br>मु. पो. उमरगा जि. उस्मानाबाद. | अध्यक्ष | ९९६०६९०००९ |
| २ | **श्री. अश्लेष शिवाजीराव मोरे**<br>मु. पो. उमरगा जि. उस्मानाबाद. | उपाध्यक्ष | ९४२०२०२००७ |
| ३ | **श्री. जनार्दनराव लिंबाजी साठे**<br>मु. पो. माकणी, ता. लोहारा. | सरचिटणीस | ८२७५७६१४०० |
| ४ | **श्री. पद्माकरराव विश्वंभरराव हराळकर**<br>मु. पो. तुगाव, ता. उमरगा. | चिटणीस | ९४२३३४१०१० |
| ५ | **डॉ. सुभाष रामराव वाघमोडे**<br>गजानन हॉस्पीटल, उमरगा ता. उमरगा. | सहचिटणीस | ७५८८९३६४०० |
| ६ | **श्री. सुरेश माणिकराव बिराजदार**<br>मु. पो. उमरगा मेन रोड, उमरगा. | सदस्य | ९४२२४६४८४७ |
| ७ | **श्री. रविंद्र विश्वनाथराव गायकवाड**<br>जुनी पेठ, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९४२२४६४६५५ |
| ८ | **श्री. अजिंक्य शिवाजीराव मोरे**<br>मु. पो. उमरगा जि. उस्मानाबाद. | सदस्य | ९९२२३३९७७७ |
| ९ | **डॉ. अमित रमेशराव पाटील**<br>जुनी पेठ, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९४२२४६५१०२ |
| १० | **श्री. भानुदासराव शिवराम माने**<br>मु. पो. बेडगा, ता. उमरगा. | सदस्य | ९४४९५४५४५१ |
| ११ | **श्री. शेषेराव नरसिंगराव पवार**<br>मु. पो. नारंगवाडी, ता. उमरगा. | सदस्य | ९४२१३७९७०७ |
| १२ | **श्री. त्र्यंबकराव गोपाळराव इंगोले**<br>मु. पो. मुरुम, ता. उमरगा. | सदस्य | ७०५७५१९८७० |
| १३ | **श्री. सुनिल चंद्रभान माने**<br>अजय नगर, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९४२२०६९५५० |
| १४ | **श्री. रामराव भानुदासराव इंगोले**<br>साने गुरुजी नगर, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९९२१७१२००९ |
| १५ | **डॉ. विजय निवृत्तीराव पाटील**<br>विजय क्लिनीक, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९४२२०७०१६१ |
| १६ | **श्री. तानाजी भिमराव फुगटे**<br>मु. पो. मुरुम, ता. उमरगा. | सदस्य | ८४५९८७५२५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| **१७** | **श्री. दिगंबर पांडुरंग बिराजदार**<br>मु.पो. मुळज, ता. उमरगा. | सदस्य | ८२७५४६१४१९ |
| **१८** | **श्री.विठ्ठलराव आप्पाराव नरसाळे**<br>मु.पो.माकणी ता. लोहारा | सदस्य | ९४०४६२२७११ |
| **१९** | **श्री.अशोकराव बाबुराव पाटील**<br>मु.पो.माडज, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९६६५४८२३४१ |
| **२०** | **श्री.राजेंद्र धनराज माने**<br>मु.पो.माडज, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९८२२७४७४८६ |
| **२१** | **प्राचार्य डॉ.जी.एच.जाधव**<br>न्यु.बालाजी नगर, उमरगा ता. उमरगा. | सदस्य | ९४२१३५९९०२ |

## (अ) महाविद्यालय विकास कमिटी

| अ.क्र. | संपूर्ण नाव व पत्ता | पद | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मा. श्री. अमोल शिवाजीराव मोरे | अध्यक्ष | ९९६०६९०००९ |
| २ | मा. श्री. जनार्धनराव लिंबाजी साठे | चिटणीस | ८२७५७६१४०० |
| ३ | मा. डॉ. सुभाषराव रामराव वाघमोडे | सह.चिटणीस | ७५८८८३६४०० |
| ४ | प्रा. डॉ. जावळे बी.एच | सदस्य | ७५८८१९१२९९ |
| ५ | प्रा. डॉ. लोमटे के. ए. | सदस्य | ९४०४६५७३३६ |
| ६ | प्रा. डॉ. खराडे आर. एम. | सदस्य | ९०२२८९०२२४ |
| ७ | प्रा.डॉ . चोचंडे आर. यू. | सदस्य | ९४०५४६३७७६ |
| ८ | मा. श्री. जगताप के. एस. | सदस्य | ९४२३३९६८४० |
| ९ | श्री. तोरमाळे भिमाशंकर संगप्पा | सदस्य | ७७९८९९९८९८ |
| १० | मा. श्री. बेडजवळगे भिमाशंकर राजेंद्र | सदस्य | ९५२७६६८७४९ |
| ११ | प्रा.डॉ. सारणीकर युवराज प्रभाकर | सदस्य | ९४२३३४५३६५ |
| १२ | मा. माधवराव आत्माराम पाटील | सदस्य | ९१५८५७८३६५ |
| १३ | गणेश विठ्ठल मुसांडे | विद्यार्थी प्रतिनिधी | ९९७५३३३८१६ |
| १४ | मा. डॉ. रेडे एच. एन. | प्राचार्य | ९४२०७७००२४ |

## — संदेश...



स्वातंत्र्यपुर्वकालीन पारतंत्र्याच्या अंधकारमय काळात महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या सीमेवर मराठवाडयाच्या एका कोप-यात वसलेल्या उमरगा या ठिकाणी १९४१ साली भारत शिक्षण संस्थेची स्थापना करून आमच्या पुर्वजांनी ज्ञानाची मशाल मोठया धैर्याने हाती धरण्याचे साहस दाखविले. याच परिसरातील काही ध्येयवेडया सहका-यांनी व जनतेनेही त्यांना मोलाची साथ दिली.

राष्ट्राभिमानाने ओतप्रत भरलेल्या संस्थेच्या संस्थापकांनी संस्थेच्या नावातच राष्ट्राभिमान समाविष्ठ केला. केवळ कायदेशीर लोकशाही जनमानसाचे जीवन सुखी व श्रेष्ठ करू शकणार नाही. म्हणून शिक्षणातून सुशिक्षीत, सुसस्कृंत व जबाबदार नागरिक तयार करून त्यांना स्वतः बरोबर सभोवतालच्या समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न या शिक्षण संस्थेचा आहे.

१९४१ साली एका विद्यालयाच्या स्वरूपात बिजारोपण झालेल्या या संस्थेची आज ९ विद्यालये, ३ कनिष्ठ महाविद्यालये व २ वरिष्ठ महाविद्यालये कार्यरत असून तसेच सन २०१८-१९ मध्ये तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. आज आमच्या संस्थेत बालवाडी ते डॉक्टरेट पर्यंतच्या सर्व शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध केल्या गेल्या आहेत, हे मोठया अभिमानाने मला नमुद करावेसे वाटते. या सर्व सोयीमुळेच गत ७९ वर्षाच्या काळात उमरगा व लोहारा परिसर शैक्षणिक दृष्टया जागृत होऊन बाहेरच्या प्रगत जगाशी आपली नाळ जोडू शकलो व या स्पर्धेच्या या युगात आपले पाऊल नेटाने पुढे टाकु शकलो.

संस्थेच्या विविध शाखांमधुन आपले शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेल्या अनेकांनी विविध क्षेत्रात आपली चमक दाखवून स्वतः सोबतच संस्थेचे आणि परिसराचे नाव उज्वल केले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. शिक्षण ही निरंतर व सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. या जाणीवेतून साध्य प्रगतीतच समाधान न मानता बदलत्या काळाच्या आव्हांनाना सामोरे जावून विद्यार्थ्यांसाठी नवनवीन शैक्षणिक उप्रकम आणि व्यवसायीक व तांत्रिक कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम उपलब्ध करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशिल राहु. मानवी जीवनाच्या यशाची गुरूकिल्ली शिक्षण आहे. शिक्षणाच्या माध्यमातून यशस्वी जीवनाचे दार उघडते. म्हणून केवळ पुस्तकी शिक्षणापेक्षा मुल्य शिक्षणाचे धडे विद्यार्थ्यांना देवून एकुण एकूण प्रक्रियेतून उत्तम माणूस घडवून ज्ञानांच्या स्वातंत्र्या सोबतच त्यांच्या मध्ये सदाचार, सहकार्य भावना, सामंजस्य, स्वावलंबन, सामाजिक बांधिलकी आणि सर्वांगिण राष्ट्राभिमान रूजविण्यासाठी आम्ही बांधील आहोत. ग्रामीण परिसरातील विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहु नये ही जाणीव उराशी बांधून आम्ही योजना आखतो.

विद्यार्थी बंधु-भगिनीनों आपण संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या या सोयी सुविधांचा लाभ घेवून स्वतः सोबत संस्थेची प्रगती साधावी कारण विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यातच संस्थेचेही भवितव्य सामावलेले आहे. आपण आपल्या गुणवत्तेने महाविद्यालयांच्या लौकिकात आणखी भर घालण्याचा प्रयत्न कराल हीच अपेक्षा व्यक्त करतो.

आपण सर्वांच्या उज्वल भविष्यासाठी आमच्या हार्दिक शुभेच्छा... !

**अमोल शिवाजीराव मोरे**
अध्यक्ष,
भारत शिक्षण संस्था, उमरगा

# — मनोगत...



विद्यार्थी बंधु-भगीनीनों,

आत्मोध्दार व समाजोध्दाराचे एकमेव साधन असलेल्या उच्च शिक्षणाच्या या निरंतर प्रक्रियेमध्ये सर्व प्रथम आपले मनःपुर्वक स्वागत करतो. ज्ञान-विज्ञान, माहिती तंत्रज्ञान व स्पर्धेच्या या युगात आपण ग्रामीण भागातील आहोत, या न्युनगंडाच्या प्रभावाखाली आपण मागे राहु नये. गुणवत्तेला ग्रामीणता अडसर ठरू शकत नाही कारण तुमची गुणवत्ता अस्सल आहे. फक्त तिला प्रयत्नांची जोड आवश्यक आहे. या महाविद्यालयातील तुमच्या आत्मविश्वासाचे आणि जिद्दीचे पहिले पाऊल नक्कीच तुमच्या जीवनात क्रांती घडवू शकते. आणि त्याव्दारेच सोनेरी मुकुटात मानाचा तुरा खोवेल.

आपल्या भारत शिक्षण संस्थेने भुकंपग्रस्त व दुर्गम अशा माकणी व परिसरातील उच्च शिक्षणाची गैरसोय लक्षात घेवून जुलै १९९९ साली कला महाविद्यालय सुरू केले ज्यामुळे पुर्वी पदवी शिक्षणासाठी किमान ४० कि.मी. अंतर पार करावे लागत असे. ही या परिसरातील अडचण दूर झाली. कदाचीत या एका अडचणीमुळे यापुर्वी या परिसरातील अनेक विद्यार्थी विशेषःत विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणापासून वंचित राहिले. तसेच १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनीसाठी जुलै २००५ पासुन बी.एस्सी. पदवी अभ्यासक्रम सुरू करून व जुलै २०१० मध्ये वाणिज्य विद्याशाखेचीही ज्ञानगंगा आपल्या दरापर्यंत आली आहे.

आपले भारत शिक्षण संस्थेचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय संस्थेच्या भव्य, सुसज्ज व सर्व सोयींनी युक्त इमारतीत वसले आहे.

सर्व प्रकारची पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके, प्रबोधनपर साप्ताहीके तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र वाचन कक्ष असलेले ग्रंथालय नक्कीच आपल्या सर्वांच्या शैक्षणिक प्रक्रियेमध्ये साहयभुत ठरेल ही आशा आहे. बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा आहेत. भव्य क्रीडांगण व सर्व क्रीडा प्रकारासाठी आवश्यक साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असतो.

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेची तीन यूनिटे कार्यरत असून विविध उपक्रम तसेच विशेष शिबीरातुन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकीचे संस्कार रूजविण्याचा प्रयत्न केला जातो. शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सणांसोबतच देशाच्या जडणघडणीमध्ये ज्या महान व्यक्तींचे योगदान लाभले आहे त्यांचे स्मृतिदिन, विद्यापीठाने ठरूवून दिलेले कार्यक्रम आयोजित केले जातात. या निमित्ताने नामांकित अशा वक्त्यांचे व्याख्यान आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये पुरोगामी व विज्ञानवादी दृष्टीकोन जागृत करण्याकडे आमचा कटाक्ष असतो.

महाविद्यालयात चालणारे शैक्षणिक कार्य दर्जेदार असण्याच्या दृष्टीकोणातुन आम्ही प्रयत्नशील असतो. महाविद्यालयातील तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थ्यांशी जिव्हाळयाचे नाते निर्माण करून त्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी प्रयत्नशील असतात.

प्रिय विद्यार्थी बंधु-भगिनिंनो संस्थेने व महाविद्यालयाने आपणां सर्वांसाठी उपलब्ध करून दिलेल्या या संधीचे सोने करून पदवी घेवून महाविद्यालयाच्या बाहेर पडणारे तुमचे पहिले पाऊल एका उज्वल भवितव्याच्या नविन सोनेरी आयुष्यातील असो, हीच शुभकामना.... !

**डॉ.एच.एन.रेडे**
**प्राचार्य**
भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,माकणी

तमसो मा ज्योतिर्गमय

# भारत शिक्षण संस्था, उमरगा

## ता. उमरगा जि. उस्मानाबाद

भारत शिक्षण संस्थेची स्थापना २० व्या शतकाच्या पुर्वार्धात वर्ष १९४१ मध्ये स्वतंत्र्यपुर्व काळात राष्ट्रीय जनजागृतीच्या कार्यातून प्रेरणा घेवून झाली.**स्व.तात्यारावजी मोरे (आबा)** आणि त्यांच्या सहका-यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत शिक्षणाची मुहुर्तमेढ उस्मानाबाद जिल्हयात रोवली. आज भारत शिक्षण संस्थेच्या अंतर्गत खालील शाखा कार्यरत आहेत.

**भारत विद्यालय, उमरगा**

**भारत प्राथमिक विद्यालय , उमरगा**

**श्री छत्रपती शिवाजी (वरिष्ठ) महाविद्यालय, उमरगा**

**भारत विद्यालय, माकणी**

**श्री छत्रपती शिवाजी (कनिष्ठ) महाविद्यालय, उमरगा**

**जयराम विद्यालय, नारंगवाडी**

**श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, तलमोड**

**कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम**

**भारत विद्यालय, बेडगा**

**भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, माकणी**

**भारत प्राथमिक विद्यालय, माकणी**

**भारत विद्यालय, मळगी**

**भारत शिक्षण संस्थेचे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी**

**तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी, उमरगा**

# कार्य,ध्येय,उद्दिष्टे

◈ **दृष्टी :** भुकंपग्रस्त ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे.

◈ **कार्य :** ग्रामीण विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेचा केंद्र बिंदू मानुन ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार विद्यर्थ्यांमध्ये जीवन मुल्यांचे संवर्धन व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास.

◈ **ध्येय :**
- ग्रामीण युवक-युवतींना जबाबदार नागरिक बनविणे.
- ग्रामीण युवक-युवतींना व्यवसाय प्राप्तीस समक्ष बनवून स्वावलंबी बनविणे.
- विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करूण देणे.

◈ **उद्दिष्ट्ये :**
- विद्यार्थ्यांचे मन, वाणी व वर्तन स्वच्छ बनविणे.
- प्रतिभा जागृती व कार्यनिष्ठा.
- विद्यार्थ्यांमध्ये निःस्वार्थ सेवाभावी वृत्ती वाढीस लावणे.
- स्वविकास व सहकार्य विद्यार्थ्यांच्या अंगी बिंबविणे.
- वेळेचे भान व महत्व जोपासण्याची विद्यार्थ्यांना सवय जडविणे.
- विद्यार्थ्यांमध्ये मानवता व देशभक्ती रूजविणे.
- विद्यार्थ्यात नेतृत्व गुण वाढविणे.
- विद्यार्थ्यामध्ये क्रियाशिलता व तार्किक प्रवृत्ती रूजविणे.

## VISION MISSION GOALS & OBJECTIVES

◈ **VISION :** To Impart Higher Education In earthquake affected rural area.

◈ **MISSION :** Spread of skill based Education in rural Youth Inculcation of Values and Overall Personality Development.

◈ **GOALS :**
- Making Rural Youth Responsible citizens.
- Enabling rural youth to find out employments and making them independent.
- Availing opportunities for all round development of the students.

◈ **OBJECTIVES:**
- Making students clean of Mind Utterance and behaviour.
- Ignition to talent and commitment of task.
- Developing the attitude of selfless service.
- Inculcation of personal development and co-operative attitude among students.
- Instilling  Activeness and Rationalism among studens.
- Inculcating humanity and patriotsim among students.
- Promoting leadership qualities among the students.
- Imprinting the importance of time and discipline in the minds of the students.

# Core Values

◈ **Cultural Competence :**
We belive that students should experience cultural activities as they grow in their appreciation for the diversity of ideas and people, both inside and outside the classroom.

◈ **Freedom of thought and expression :**
We are committed to promote and defend freedom of thought and expression in academic inquiry and other activities.

◈ **Value Based Education :**
We are committed to inculcate values of life amongst the students in order to induce honesty, integrity, encouraging and building student ability, character, creativity and develop the responsible citizens of the country.

## प्रवेशाच्या वेळी आवश्यक प्रमाणपत्र

◈ **बी.ए.,बी.एस्सी.,बी.कॉम.प्रथम वर्षासाठी प्रवेश घेताना प्रवेश अर्जासोबत विद्यार्थ्याने खलील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

- बारावी किंवा तत्सम परीक्षेस मुळ गुणपत्रक व दोन सत्यप्रती.
- शाळा सोडल्याचा मुळ दाखला (टि.सी.) व दोन सत्यप्रती.
- पासपोर्ट साईज दोन फोटो.
- इतर विद्यापीठातून, परप्रातातून आलेल्या विद्यार्थ्यांना स्थलांतर दाखला आवश्यक.
- योग्यता प्रमाणपत्र (विद्यापीठाचे प्रमाणपत्र)
- ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडलेला आहे. त्यांनी सदरील खंडासाठी गॅप सर्टिफिकेट द्यावे.
- आधार कार्ड साक्षांकित २ सत्यप्रती
- राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स.
- EBC/PTC/BC Freeship/Gol Scholarship/माजी सैनिक/अपंग विद्यार्थ्यांनी आपण ज्या सवलतीस पात्र आहोत. त्या सवलतीचे अर्ज आवश्यक त्या कागद पत्रासह प्रवेश अर्जासोबतच दाखल करावेत. कागदपत्रे वेळेत दाखल न केल्यास किंवा फी माफी सवलत मान्य झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील.
- एकदा प्रवेश घेतल्यास मुळ कागदपत्रे व सत्यप्रती परत मिळणार नाहीत.

## पात्रता प्रमाणपत्र
## (Eligibility Certificate)

प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेणा-या तसेच विद्यापीठ बदलून प्रवेश घेणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांने पात्रता प्रमाणपत्राचा फॉर्म प्रवेश अर्जा सोबत जोडावा. जो पर्यंत विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्राचा क्रमांक Eligibility Certificate दिला जाणार नाही, तो पर्यंत सदरील विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्पुरता स्वरूपाचा राहील. पात्रता प्रमाणपत्र फॉर्म सोबत गुणपत्रिकेच्या दोन सत्यप्रती जोडाव्यात जे विद्यार्थी विद्यापीठ बदलून प्रवेश घेत असतील त्यांनी मायग्रेशन सर्टिफिकेट जोडावे. डी.एड.उत्तीर्ण विद्यार्थ्यांनांही मायग्रेशन सर्टीफिकेट जोडणे आवश्यक आहे.

## सरकारी शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य

राज्य सरकारच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती, राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती, कर्जाऊ शिष्यवृत्ती इत्यादी शिष्यवृत्तीसाठी शासनाच्या नियमांप्रमाणे विद्यार्थ्यांचे वेळेत अर्ज पाठविले जातील.

**अ) राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती योजना सवलत (ई.बी.सी.)**
**आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांकरीता (ई.बी.सी.) सवलत**
**सवलतीसाठी खालील कागदपत्रे जोडणे आवयश्क आहे.**
(सर्व कागदपत्रे दोन साक्षांकित छाया प्रतीत जोडावीत)

- बी.ए., बी.एस्सी. प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाकरिता.
- उत्पन्नाचे प्रमाणपत्र तहसील कार्यालयाचे २०२१-२२
- ज्यांचे पालक हयात नसतील त्यांनी पालक हयात नसल्याचे प्रमाणपत्र.
- ज्यांचे पालकांचे सन २०२१-२२ चे वार्षिक उत्पन्न ५०००००/-पेक्षा कमी आहे. अशाच विद्यार्थ्यांना
- सवलतीस पात्र समजले जाईल.
- ऑनलाईन ई.बी.सी.फॉर्म भरून कार्यालयात जमा करावे.
- राष्ट्रीयकृत बँकेचे खाते असणे आवश्यक आहे. पासबुकचे झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

### ब) पी.टी.सी. सवलत (P.T.C.)

ज्या विद्यार्थ्याचे पालक प्राथमिक शिक्षक असतील त्यांनी या सवलतीसाठी अर्ज दोन प्रतीत करावा.

- पी.टी.सी. अर्ज
- नोकरीचा दाखला (गटशिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरीचा)
- अपत्य प्रमाणपत्र
- कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र
- गुणपत्रिकेची सत्यप्रत

## क) भारत सरकार शिष्यवृत्ती (GOI Scholarship)

**भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाया विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची पुर्तता करावी.**

- भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज
- शाळा सोडल्याचा दाखला (सत्यप्रत)
- उत्तीर्ण झालेल्या वर्गाचा मार्क्समेमो (सत्यप्रत)
- जातीचे प्रमाणपत्र (सत्यप्रत)
- अपत्य प्रमाणपत्र
- जर पालक नोकरीत असतील तर २०२१-२२ चे (१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२) उत्पन्नाचे प्रमाणपत्र
- सदर शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा रू.२,००,०००/- (अनुसुचित जाती करिता) पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.
- सदर शिष्यवृत्ती पात्र ठरण्यास वार्षिक उत्पन्न रू. १,००,०००/- पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.
- शिक्षणासाठी जिल्हा बदल असेल तर समाजकल्याण अधिकारी यांचे जिल्हा बदल प्रमाणपत्र
- शिष्यवृत्ती मंजुरी क्रमांक (Scholarship Sanction Number)
- ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म भरून कार्यालयात जमा करावे.

## ड) बी.सी.फ्री. शीप

ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न रू. ५९,०००/- पेक्षा जास्त आहे अशा विद्यार्थ्यांनी या सवलतीसाठी अर्ज करावा. त्यासाठी विहीत नमुन्यामध्ये अर्ज करावा. तसेच एकदा अनुत्तीर्ण होऊन प्रवेश घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यानाही या सवलतीसाठी अर्ज करता येतो.

## इ) स्वातंत्र्यसैनिक शिष्यवृत्ती

ज्या विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यसैनिकाची शिष्यवृत्ती मिळते अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबतच खालील पूर्ततेसह आपले अर्ज प्रत्येकी दोन प्रतीत विहीत नमुन्यात सादर करावेत.

- सन्मानपत्राच्या दोन सत्यप्रती
- अपत्य प्रमाणपत्र
- गुणपत्रकाची सत्यप्रत
- गतवर्षीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र
- पालकांचा करारनामा

## फ) अपंग शिष्यवृत्ती

ही शिष्यवृत्ती ज्या अपंग विद्यार्थ्यांना मागील वार्षिक परीक्षेत ४० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत व ज्यांच्या पालकाचे उत्पन्न रू. १,००,०००/- पेक्षा कमी आहे व जो विद्यार्थी वसतीगृहात राहत नाही अशा विद्यार्थ्यांना मिळते. त्यांनी अर्जासोबत खालील कागदपत्रे दोन प्रतीत सादर करावे.

- अपंग प्रमाणपत्राच्या दोन सत्यप्रती
- अपत्य प्रमाणपत्र
- गुणपत्रकाची सत्यप्रत
- गतवर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र
- पालकांचा करारनामा

## राखीव जागांचे आरक्षण खालीलप्रमाणे राहील

शासन निर्णय शिक्षण विभाग क्र.एम.आय.एस. १०४७/एम. दि. २७ जून १९९४ अन्वये मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार मागासवर्गीय व इतर मागासवर्गीयांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेल.

| | | |
|---|---|---|
| १. | एस. सी. | १३ टक्के |
| २. | एस. टी. | ७ टक्के |
| ३. | एन. टी. | ३ टक्के |
| ४. | व्ही. जे. एन. टी. (२८ जाती १९९० पूर्वीच्या) | २.५ टक्के |
| ५. | व्ही. जे. एन. टी. (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ टक्के |
| ६. | व्ही. जे. एन. टी. (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| ७. | ओ. बी. सी. | १९ टक्के |
| ८. | एस. बी. सी. | २ टक्के |
| | | **एकूण ५२ टक्के** |

प्रथम प्रवेश अर्ज स्वीकारले जातील. त्यानंतर छाननीतून गुणवत्तेनुसार व आरक्षणाप्रमाणे प्रवेश यादी जाहीर केली जाईल. त्यानंतर मुळ प्रमाणपत्रे सादर केल्यावर प्रवेश कायम होईल.

**टीप :** सदर आरक्षण धोरणामध्ये वेळोवेळी शासन निर्गमित अध्यादेश व आदेश यानुसार बदल संभाव्य आहेत.

## पदवी अभ्यासक्रम कार्यक्रम

### • कला विद्याशाखा •

**◈ बी. ए. प्रथम वर्ष : (Semester I & II)**

**प्रवेश मर्यादा** : **२४०**
**अनिवार्य विषय** : इंग्रजी, संगणकशास्त्र
**द्वितीय भाषा** : मराठी/हिंदी
**ऐच्छिक विषय** : १) मराठी / हिंदी / इंग्रजी
२) इतिहास
३) राज्यशास्त्र
४) भूगोल / समाजशास्त्र

**टीप : १.** उपरोक्त ४ गटापैकी तीन विषय म्हणून निवड करता येतील.
**२.** MS-CIT उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संगणकशास्त्र विषय घेणे आवश्यक नाही.
**३.** मात्र MS-CIT प्रमाणपत्राचे झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

◈ **बी. ए. द्वितीय वर्ष : (Semester III & IV)**

**प्रवेश मर्यादा** : **२४०**

**अनिवार्य विषय** : इंग्रजी, पर्यावरणशास्त्र

**द्वितीय भाषा** : मराठी/हिंदी

**ऐच्छिक विषय** : १) मराठी / हिंदी / इंग्रजी

२) इतिहास

३) समाजशास्त्र / राज्यशास्त्र

४) भूगोल

◈ **बी. ए. तृतीय वर्ष : (Semester V & VI)**

बी. ए. तृतीय वर्षामध्ये विद्यार्थ्यांना बी. ए. प्रथम व द्वितीय वर्षामध्ये अभ्यासलेल्या तीन ऐच्छिक विषया पैकी एक विषय मुख्य व उर्वरित दोन विषय सहाय्यक म्हणून अभ्यासावे लागतील.मुख्य विषयासाठी १०० गुणांचे प्रकल्पकार्य (Project Work) संबंधीत विषयाच्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण करावे.

## ● विज्ञान विद्याशाखा ●

◈ **बी. एस्सी. प्रथम वर्ष : (Semester I & II)**

**प्रवेश मर्यादा** : १२०

**अनिवार्य विषय** : इंग्रजी, संगणकशास्त्र

**द्वितीय भाषा** : मराठी / हिंदी

**ऐच्छिक विषय** : खालीलपैकी कोणत्याही एका ग्रुपची निवड करता येईल.

Group I - Physics, Chemistry, Mathematics

Group II - Chemistry, Botony, Zoology

**टीप :** MS-CIT उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संगणकशास्त्र विषय घेणे आवश्यक नाही.

◈ **बी. एस्सी. द्वितीय वर्ष : (Semester III & IV)**

◆ प्रवेश मर्यादा : १२० अनिवार्य विषय : इंग्रजी, पर्यावरणशास्त्र

◈ **बी. एस्सी. तृतीय वर्ष : (Semester V & VI)**

◆ ऐच्छिक : प्रथम वर्षात निवडलेले ऐच्छिक विषय अभ्यासावे लागतील.

## ● वाणिज्य विद्याशाखा ●

### ◈ बी. कॉम. प्रथम वर्ष : (Semester I & II)

**प्रवेश मर्यादा** : १२०

**अनिवार्य विषय** : इंग्रजी

**द्वितीय भाषा** : मराठी / हिंदी

**ऐच्छिक विषय** : Computer App. in Business I & II
Entrepreneurship Development I & II
Business & Industrial Economics I & II
Business Mathematics & Statistics I & II
Financial Accounting I & II

### ◈ बी. कॉम. व्दितीय वर्ष : (Semester III & IV)

**प्रवेश मर्यादा** : १२०

**अनिवार्य विषय** : इंग्रजी, पर्यावरणशास्त्र

**द्वितीय भाषा** : मराठी / हिंदी

**ऐच्छिक विषय** : IT Application in Business III & IV
Principles of Business Management I & II
Corporate Acconuting I & II
Business Regulatory Framework I & II
Human Resource Management I & II

### ◈ बी. कॉम. तृतीय वर्ष : (Semester V & VI)

**प्रवेश मर्यादा** : १२०

**ऐच्छिक विषय** : Advanced Financial Accounting I & II
Management Accounting I & II
Cost Accounting I & II
Indirect Taxes & Direct Taxes I & II
New Auditing Trends I & II
Banking & Insurance I & II

## ● B.Voc ●

### ◈ B.Voc Ist Year : (Semester I & II)

| | |
|---|---|
| Dairy Products | (Semester I & II) |
| Horticulture Technology | (Semester I & II) |
| Nursary Science | (Semester I & II) |

### ◈ B.Voc Ist Year : (Semester III & IV)

| | |
|---|---|
| Dairy Products | (Semester III & IV) |
| Horticulture Technology | (Semester III & IV) |
| Nursary Science | (Semester III & IV) |

## ● परिक्षा पध्दती ●

### ◈ बी.ए./बी.एस्सी /बी.कॉम.

विद्यापीठाच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासुन प्रथम वर्षाकरिता (Semester system) लागू करण्यात आला आहे. चालू शैक्षणिक वर्षात तीनही विद्याशाखांच्या प्रथम, व्दितीय व तृतीय वर्गाच्या परिक्षा सत्र पध्दतीनुसार होतील. बी.कॉम.प्रथम सत्र व व्दितीय सत्र परिक्षा ८० गुणांसाठी तसेच इतर विद्याशाखेची परिक्षा ५० गुणांसाठी होईल व बी.ए.तृतीय विद्यार्थ्यांसाठी मुख विषयात १०० गुणांचे प्रकल्प कार्य असेल.

### ◈ उत्तीर्णतेचे निकष

सत्र परिक्षा पध्दतीमध्ये प्रत्येक पेपरसाठी बी.ए.व बी.एस्सी.विद्याशाखेसाठी ५० गुणांची परिक्षा द्यावी लागेल. व विद्यार्थ्याला संबंधित पेपरमध्ये उतीर्ण होण्याकरिता लेखी परिक्षेत ५० पैकी २० गुण घ्यावे लागतील. बी.कॉम प्रथम वर्षासाठी ८० पैकी ४० गुण घ्यावे लागतील. व बी.ए.तृतीय वर्गाच्या विद्यार्थ्यासाठी मुख्य विषयासाठी १०० गुणांच्या प्रकल्प कार्यात किमान ४० गुण घ्यावे लागतील. वरील पैकी कुठल्याही एकामध्ये उतीर्ण होण्याकरिता आवश्यक किमान गुण प्राप्त नाही केल्यास विद्यार्थ्यांस अनुतीर्ण घोषीत करण्यात येईल.

## ● शिस्त व आचारसंहिता ●

### ◈ शिस्त

◆ स्वयंशिस्त हीच सर्वोत्तम शिस्त होय. महाविद्यालयीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यास सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन नियम व अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

◆ महाविद्यालयातील किंवा महाविद्यालय परिसरात प्रशासनाच्या परवानगी शिवाय कोणतीही कृती/कार्यक्रम करण्यास मज्जाव राहील. कोणत्याही राजकीय किंवा अन्य स्वरूपाचा बाह्य दबाव महाविद्यालयावर आणल्यास शिस्तीचे उल्लंघन समजले जाईल.

◆ महाराष्ट्र सरकार कायद्यानुसार व महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब करणारे विद्यार्थी शिक्षेस पात्र ठरतील.

### ◈ आचारसंहिता

◆ महाविद्यालयात आणि महाविद्यालयातील परिसरात विद्यार्थ्यांकडे वैध ओळखपत्र असणे आवश्यक आहे. आणि महाविद्यालयातील स्टाफ ने मागता क्षणी ते दाखविणे त्यास बंधनकारक आहे.

◆ वर्गामध्ये तास चालू असताना विद्यार्थ्यांनी व्हरांड्यात रेंगाळत थांबू नये.

◆ विद्यार्थ्यांनी बाहेरील व्यक्तींना महाविद्यालयात सोबत आणू नये.

◆ विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या परवानगीशिवाय इतर विद्यार्थी किंवा बाहेरील कोणाही व्यक्तीकडून कसलाही निधी गोळा करू नये.

◆ विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या लिखित परवानगीशिवाय कोणत्याही शैक्षणिक सहल, मोहीम, भेट, वनभोजन व समारंभ इ. यासारखे कार्यक्रम आयोजित करू नये.

◆ नियमबाह्य वर्तन करणा-या विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार प्राचार्यांना असतील. त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

◆ रॅगिंग सदृशवर्तन असणा-या विद्यार्थ्यांवर प्रोव्हीबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट १९९९ ॲक्ट नं. ३३ ऑफ ९९ नुसार कडक कारवाई केली जाईल.

## ◈ गैरवर्तन

**खालील कृत्यांचा समावेश गैरवर्तनात होतो.**

◆ पान, तंबाखू, गुटखा, इ. खाणे. ◆धुम्रपान करणे, भिंतीवर थुंकणे.
◆ ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात येणे. ◆ गटबाजी करणे, भांडणे करणे, गोंधळ घालणे.
◆ विद्यार्थिनींची छेडछाड करणे.
◆ महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकावर, बोर्डावर असभ्य मजकूर लिहिणे वा काढणे.
◆ वर्ग चालू असताना व्हरांड्यात रेंगाळणे किंवा वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हालचाली करणे.
◆ प्राध्यापक व कर्मचायांशी उध्दट वर्तन करणे व आज्ञाभंग करणे.

उपरोक्त गैरवर्तन करणाया विद्यार्थ्यांना प्रथम ताकीद दिली जाते. नंतर दंड केला जातो. शैक्षणिक सवलती बंद केल्या जातात. परीक्षा फॉर्म भरला जात नाही. प्रवेश रद्द केला जातो व विशिष्ट प्रसंगी अशा विद्यार्थ्यांवर पोलिस कारवाई केली जाते.

## ◈ सर्वसाधारण सुचना

बी.एस.एस. कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय विद्यार्थ्यांना घडवत असताना त्यांच्या बौध्दिक पातळीत वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने आणि धैर्याने जीवनातील वास्तवाला तोंड देवू शकतील. स्वतःचे वर्तन या महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेला साजेसे व आत्मसन्मानाने ठेवावे. शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्याशी आदरभावाने वागणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य असेल.

## ◈ सूचना फलक

महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी सूचना लावल्या जातात. त्या सर्व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. त्या पाहण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे. सूचना न वाचल्यामुळे होणा-या नुकसानीस महाविद्यालंय जबाबदार राहणार नाही.

## ◈ दैनंदिन उपस्थिती

महाविद्यालयीन शैक्षणिक कामकाजाच्या दिवसाच्या ७५ टक्के उपस्थिती न भरल्यास होणा-या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस संबंधित विद्यार्थी जबाबदार राहतील.

## फीस संबंधी माहिती

| अ.क्र. | विवरण | बी.ए./बी.एस्सी. | बी.कॉम |
|---|---|---|---|
| १ | माहिती पुस्तिका | २५.०० | २५.०० |
| २ | नोंदणी फी | २५.०० | २५.०० |
| ३ | प्रवेश फी | २५.०० | २५.०० |
| ४ | टयुशन फी | ८००.०० | १६००.०० |
| ५ | प्रयोगशाळा फी | ३००.०० | ३००.०० |
| ६ | कॉलेज परिक्षा फी | ७५.०० | ७५.०० |
| ७ | ओळखपत्र | १०.०० | १०.०० |
| ८ | ग्रंथालय फी | ५०.०० | ५०.०० |
| ९ | जिमखाना फी | ५०.०० | ५०.०० |
| १० | विद्यर्थी मदत निधी | १०.०० | १०.०० |
| ११ | महाविद्यालय विकास निधी | १००.०० | १००.०० |
| १२ | विद्यार्थी फोरम फी | १०.०० | १०.०० |
| १३ | युथ फेस्टिवल फी | ५०.०० | ५०.०० |
| १४ | पर्यावरणशास्त्र फी | १००.०० | १००.०० |
| १५ | संगणकशास्त्र फी | १००.०० | १००.०० |
| १६ | वैद्यकीय तपासणी फी | १५.०० | १५.०० |
| १७ | विविध उपक्रम फी | | |
| १८ | वार्षिक अंक फी | ५०.०० | ५०.०० |
| १९ | स्नेहसमेंलन फी | ५०.०० | ५०.०० |

## विद्यापीठ फीस

| अ.क्र. | विवरण | बी.ए./बी.एस्सी. | बी.कॉम |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठ कल्याण फी | २०.०० | २०.०० |
| २ | आपत्कालीन कनधी | २०.०० | २०.०० |
| ३ | आविष्कार फी | ०४.०० | ०४.०० |
| ४ | ई- सुविधा फी | ५०.०० | ५०.०० |
| ५ | पर्यावरण परिक्षा फी | ५०.०० | ५०.०० |
| ६ | संगणक परिक्षा फी | ५०.०० | ५०.०० |
| ७ | कमवा व शिका योजना फी | १०.०० | १०.०० |
| ८ | अश्वमेध फी | ०४.०० | ०४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | इंद्रधनुष फी | ०४.०० | ०४.०० |
| १० | आव्हान फी | ०४.०० | ०४.०० |
| ११ | अभियान फी | ०४.०० | ०४.०० |
| १२ | विद्यापीठ फी | १०.०० | १०.०० |
| १३ | राष्ट्रीय सेवा योजना | १०.०० | १०.०० |
| १४ | योग्यता प्रमाणपत्र फी | | |
| | मराठवाडयातील विद्यार्थ्यांकरिता | ५०.०० | ५०.०० |
| | मराठवाडयाच्या बाहेरील विद्यार्थ्यांकरिता | १००.०० | १००.०० |
| | महाराष्ट्रा बाहेरील विद्यार्थ्यांकरिता | ५००.०० | ५००.०० |
| | परदेशी विद्यार्थ्यांकरिता | १२५००.०० | १२५००.०० |

## ● कार्यक्रम संचालन ●

महाविद्यालयात अध्ययन व अध्यापन कार्य खालील पध्दतीने पार पाडले जाते.

| | |
|---|---|
| व्याख्यान पध्दती | Lecture Method |
| वर्गपाठ व गटचर्चा | Classroom Exercise & Group Discussion |
| सेमीनार व कार्यशाळा | Seminar & Workshop |
| प्रात्यक्षीक | Practicals |
| निवडक प्रकरण अभ्यास | Selective Drill |
| निमंत्रीत वक्ते व्याख्यान | Guest Lecture |
| इंटरनेटचा उपयोग | Use of Internet |
| शैक्षणिक व औद्योगिक सहली | Educational and Industrial Tours |
| प्रकल्प कार्य | Project Work |
| घटक चाचणी | Monthly Test |

## ● अभ्यासाच्या पलीकडे ●

दर्जेदार शिक्षणाचा शोध घेण्यासाठी आणि विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक व सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी बी. एस. एस. कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय, माकणी अभ्यासक्रमाबरोबर इतरही विविध कार्यक्रम राबवते आणि विद्यार्थ्यांना त्यामध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या कला कौशल्याची जाणीव होते आणि समाजाचा एक घटक या नात्याने विविध क्षेत्रातील ज्ञान संकलित करण्यात याची मदत होते. असे कार्यक्रम म्हणजे - वाढती लोकसंख्या, भ्रष्टाचार, व्यसनाधिनता, नियमित वीजपुरवठा, अस्वच्छ व अपुरा पाणीपुरवठा इ. सामाजिक समस्यांमध्ये विद्यार्थ्यांना सल्ला, मार्गदर्शन करण्याची सुवर्णसंधी मिळते.

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या उपक्रमांमध्ये सहभाग आणि चमक दाखविण्याची संधी मिळते.

सामान्य ज्ञान चाचणी परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घडामोडींची ओळख होते आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागतो. शैक्षणिक सहल, मोहीम, भेट, विविध कारखान्यांची भेट इत्यादी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान, कामाचा अनुभव आदींची माहिती मिळते.

विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेतात. त्यामुळे सांघिक कार्य, नेतृत्व, जबाबदारी व एकूणच व्यक्तिमत्त्व विकास साधला जातो.

## महाविद्यालयात खालील उपक्रम राबविले जातात.

१) विद्यार्थी संसद २) राष्ट्रीय सेवा योजना ३) क्रीडा ४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
५) क्वीज कॉम्पीटीशन ६) शैक्षणिक सहल/भेट ७) व्यवसाय संबंधी मार्गदर्शन व प्रशिक्षण

### ◈ विद्यार्थी संसद

**महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विद्यार्थी संसदेची रचना केली जाते.**

- प्रत्येक वर्गातून एक वर्गप्रतिनिधी गुणवत्तेनुसार नियुक्ती केली जाते.
- खालील उपक्रमामधून प्रत्येकी एक प्रतिनिधीची निवड गुणवत्तेनुसार केली जाते.
  अ) एन.एस.एस. ब) सांस्कृतिक कार्यक्रम क) क्रीडा
- विद्यार्थिनींमधून दोन प्रतिनिधींची गुणवत्तेनुसार नियुक्ती केली जाते.
- सर्व प्रतिनिधी आपल्यामधून एकाची सचिव म्हणून निवड करतात.
- एका शिक्षकाची नेमणूक कार्यकारी अध्यक्ष म्हणून केली जाते.

### ◈ राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

**विद्यार्थी संख्या : १०० + १०० + १०० = ३००**

महाविद्यालयात एन.एस.एस. साठी स्वतंत्र ३ युनीट कार्यरत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्य करण्यामध्ये रूची आहे व जे स्वेच्छेने एन.एस.एस. मध्ये प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांना एन.एस.एस. युनीटमध्ये सामावून घेतले जाते.

ग्रामीण भागात सामाजिक, आर्थिक सुधारणा घडवून आणणे, स्वावलंबी बनविणे हा उद्देश एन.एस.एस. युनीटचा आहे. रक्तदान, श्रमदान, स्वच्छता अभियान, साक्षरता अभियान, जनजागृती मोहीम इ. उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र उभारणीसाठी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो.

प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी पदवी परिक्षेत १० टक्के गुणांचीवाढ मिळते.

### ◈ क्रीडा

- कबड्डी, खो-खो, फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, ॲथलेटिक्स, कुस्ती इ.

# ○ वर्षभरातील कार्यक्रमसूची ○
(२०२१-२२)

◈ **जून** :

| | | |
|---|---|---|
| ०५ जून | : | जागतिक पर्यावरण दिन |
| १० जून | : | जागतिक दृष्टीदान दिन |
| २६ जून | | राजर्षी शाहू महाराज जयंती |

◈ **ऑगस्ट**

| | | |
|---|---|---|
| ०१ ऑगस्ट | : | लोकमान्य टिळक पुण्यतिथी / अण्णाभाऊसाठे जयंती |
| १५ ऑगस्ट | : | स्वातंत्र्य दिन |
| २३ ऑगस्ट | : | विद्यापीठ वर्धापन दिन |

◈ **सप्टेंबर**

| | | |
|---|---|---|
| ०५ सप्टेंबर | : | शिक्षक दिन |
| १४ सप्टेंबर | : | हिंदी दिवस |
| २४ सप्टेंबर | : | राष्ट्रीय सेवा योजना दिन |
| १७ सप्टेंबर | : | मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन |
| ३० सप्टेंबर | : | भुकंपातील मृत आत्म्यास सामुदायिक श्रध्दांजली पर कार्यक्रम |

◈ **ऑक्टोबर**

| | | |
|---|---|---|
| ०२ ऑक्टोबर | : | महात्मा गांधी जयंती |
| १५ ऑक्टोबर | : | जागतिक अंध दिन |

◈ **नोव्हेंबर**

| | | |
|---|---|---|
| १४ नोव्हेंबर | : | पं.नेहरू जयंती (बालदिन) |
| २८ नोव्हेंबर | : | महात्मा फुले स्मृतिदिन |

◈ **डिसेंबर**

| | | |
|---|---|---|
| १ डिसेंबर | : | एड्स दिन |
| ६ डिसेंबर | : | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन |
| २० डिसेंबर | : | संत गाडगेबाबा पुण्यतिथी |

◈ **जानेवारी**

| | | |
|---|---|---|
| ३ जानेवारी | : | सावित्रीबाई फुले जयंती |
| १२ जानेवारी | : | राष्ट्रीय युवा दिन, जिजामाता जयंती, विवेकानंद जयंती |
| १४ जानेवारी | : | विद्यापीठ नामविस्तार दिन |
| २३ जानेवारी | | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती |

२६ जानेवारी : प्रजासत्ताक दिन
३० जानेवारी : महात्मा गांधी पुण्यतिथी

**फेब्रुवारी**

१९ फेब्रुवारी : श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती
२८ फेब्रुवारी : राष्ट्रीय विज्ञान दिन

**◈ मार्च**

८ मार्च : जागतिक महिला दिन
१० मार्च : सावित्रीबाई फुले स्मृतिदिन
१९ मार्च : जागतिक अपंग दिन
२३ मार्च : जागतिक हवामान दिन

**◈ एप्रिल**

७ एप्रिल : जागतिक आरोग्य दिन
१४ एप्रिल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**◈ मे**

१ मे : महाराष्ट्र दिन
२ मे : रेडक्रॉस दिन/टागोर जयंती

**◈ विभाग निहाय**

१४ सप्टेंबर : हिंदी दिवस (हिंदी विभाग )
१४ जानेवारी : भूगोल दिवस (भूगोल विभाग)
२७ फेब्रुवारी : मराठी भाष गौरव दिन (मराठी विभाग)

भारत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी

ता.लोहारा जि.उस्मानाबाद

**प्राचार्य**

| | | |
|---|---|---|
| डॉ.एच.एन.रेडे | M. A., Ph.D. | 9420770024 |

**मराठी विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.सुरवसे के.आर | M. A., NET, Ph.D. | 9421872171 |

**हिंदी विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.येल्लुरे एम.ए. | M. A.,M.Phil.,Ph.D.,DIHD | 9403392105 |
| प्रा..डॉ.खराडे आर.एम. | M. A.,SET, Ph.D. | 9022890224 |

**इंग्रजी विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.मुंगळे एस.डी. | M. A.,M.Phil.,Ph.D. | 9422471662 |
| प्रा.लोमटे के.ए. | M. A.,NET, M.Phil | 9404657336 |

**इतिहास विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.बिराजदार डी.एस. | M. A.,SET, Ph.D. | 9421354882 |

**भूगोल विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.चोचंडे आर.यू. | M. A.,M.Phil.,Ph.D. | 9405463776 |
| प्रा.डॉ.गावित एस.डी. | M. A.,M.Phil.,Ph.D. | 9860708660 |

**राज्यशास्त्र विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.मुंडे एस.ई. | M. A.,SET.,Ph.D. | 9404624951 |

**समाजशास्त्र विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.गाडेकर ए.एम. | M. A.,SET,NET, Ph.D. | 9545439048 |

**शिक्षण विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.पाटील ए.सी. | M. A.,M.P.Ed.,SET, M.Phil., Ph.D. | 8600134051 |

**भौतिकशास्त्र विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.बिराजदार ए.पी. | M.Sc.,M.Phil.,Ph.D. | 9604465255 |

**रसायनशास्त्र विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.जावळे बी.एच. | M.Sc.,SET.,M.Phil.,Ph.D. | 9423243177 |
| प्रा.डॉ.माने वाय.डी. | M.Sc.,NET, SETGATE, Ph.D. | 9422045272 |
| प्रा.डॉ.पतंगे व्हि.एन. | M.Sc.,SET, Ph.D | 9421025297 |

**प्राणीशास्त्र विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.कांबळे एस.डी. | M.Sc.,M.Phil.,Ph.D. | 7798367542 |

**वनस्पती शास्त्र विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.बिराजदार एस.आर. | M.Sc.,Ph.D. | 9421354696 |

**गणित विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.मोरे पी.एम. | M.Sc.,M.Phil.,B.Ed.Ph.D. | 9421872151 |

**वाणिज्य विभाग**

| | | |
|---|---|---|
| प्रा.काळे अरविंद मनोहर | M.Com. | 9890029541 |

भारत शिक्षण संस्थेचे

## कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी

ता.लोहारा जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जगताप के.एस. | अधिक्षक | 9423396840 |
| २ | श्री. घोडके व्ही.एस. | मुख्य लिपीक | 9421308100 |
| ३ | श्रीमती स्वामी एस.एम. | वरिष्ठ लिपीक | 9421871931 |
| ४ | श्री. मुगळे आर.के. | कनिष्ठ लिपीक | 9890138336 |
| ५ | श्री. शिंदे बी.डी. | कनिष्ठ लिपीक | 9921018937 |
| ६ | श्री. सोमवंशी एस.एस. | प्र.सहाय्यक | 9604629292 |
| ७ | श्री. देशमुख डी.एस. | प्र.सहाय्यक | 7888192149 |
| ८ | श्री. इंगळे एस.पी. | ग्रंथालय परिचर | 9421355007 |
| ९ | श्री. जगताप एम.एम. | ग्रंथालय परिचर | 8805100269 |
| १० | श्री. चव्हाण एस.व्ही. | प्रयोगशाळा परिचर | 9421550810 |
| ११ | श्री. जाधव व्ही.व्ही. | प्रयोगशाळा परिचर | 9850410702 |
| १२ | श्री. साळुंके व्ही.व्ही. | प्रयोगशाळा परिचर | 9130139302 |
| १३ | श्री. गुत्तीवाले जे.जे. | प्रयोगशाळा परिचर | 8485030452 |
| १४ | श्री. आळंगे एन.एस. | प्रयोगशाळा परिचर | 9420311170 |
| १५ | श्री. पठान एन.ए. | प्रयोगशाळा परिचर | 8275924464 |
| १६ | श्री. दुधाने एम.टी. | प्रयोगशाळा परिचर | 8275924464 |
| १७ | श्री. वाघमारे यु.पी. | सेवक | 9545880711 |
| १८ | श्री. कुसळकर बी.जी. | सेवक | 9420201412 |
| १९ | श्री. नरसाळे बी.एस. | सेवक | 8275759665 |

# ● रॅगिंग करण्यास मनाई ●

**रॅगिंग म्हणजे काय ?**

ज्यामुळे कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यास शारिरीक किंवा मानसिक हानी पोहचत असेल किंवा पोहोचण्याची शक्यता असेल किंवा त्यांच्यात धास्तीची किंवा भितीची अथवा लज्जेची किंवा अडचणीत आल्याची भावना निर्माण होत असेल असे गैरवर्तणुकीचे प्रदर्शन करणे किंवा तसे कृत्य करणे म्हणजे रॅगिंग होय. खालीलपैकी एक किंवा अनेक कृती रॅगिंग प्रकारात येतात.

- ◆ नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी संभाषणाने वा लिखीत चिठ्ठीद्वारे अपमानित करणे.
- ◆ विद्यार्थ्याला अशी एखादी कृती करायला लावणे की ज्यामुळे त्याच्या मनात लाज आणि भिती निर्माण होते.
- ◆ नवीन विद्यार्थ्यांचे आर्थिक शोषण करणे.
- ◆ ई-मेल, सार्वजनिक ठिकाणी किंवा पत्राद्वारे धमकी देणे.
- ◆ विद्यार्थ्यांना वाम मार्गाला प्रवृत्त करणे.
- ◆ समुहाच्या माध्यमातून आपल्याच नियंत्रणात राहण्यासाठी दबाव निर्माण करणे.
- ◆ विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेची टर उडविणे आणि आत्मविश्वास दुरावणे अशी कृती करणे.
- ◆ अध्ययनात अडथळा निर्माण करणे अथवा तशी कृती करण्यास प्रवृत्त करणे.

**महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंध समिती स्थापन केली असून दोषी विद्यार्थ्यांना खालीलपैकी एक किंवा अनेक शिक्षा होऊ शकतात.**

- ◆ वर्गात उपस्थित राहण्यास प्रतिबंध.
- ◆ विद्यार्थ्यांना मिळणा-या सर्व सुविधापासून वंचित करणे. उदा. स्कॉलरशीप, हॉस्टेल, लायब्ररी बुक इ.
- ◆ कोणत्याही चाचणी परीक्षेला बसता येणार नाही.
- ◆ परीक्षेचे निकाल राखून ठेवणे.
- ◆ प्रादेशिक, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा, कला, युवक महोत्सवामध्ये सहभागास मज्जाव करणे.
- ◆ प्रवेश रद्द करणे.
- ◆ चार सत्र परीक्षा किंवा दोन शैक्षणिक वर्ष शिक्षणापासून वंचित
- ◆ समुहामध्ये रॅगिंग करणारा विद्यार्थी सापडला नाही तर संपूर्ण समुहातील विद्यार्थी शिक्षेस पात्र राहतील.

# Committees of The Institute

Academic Year 2021-2022

| No. | Name of the Committee | Chairman / Members |
|---|---|---|
| 01 | **Internal quality Assurance Cell** | Chairman : Dr. Rede H. N.<br>Members : Mr. Sathe J. L. (Director)<br>Co-ordinator : Dr. Munde S. E.<br>Mr. Kalshetti G.A. (Citizen)<br>Dr. Chochande R.U.<br>Mr. Lomte K. A.<br>Dr. Jawale B. H.<br>Dr. Kharade R. M.<br>Dr. Patange V. N.<br>Dr. Birajdar S. R.<br>Mr. Jagtap K. S. |
| 02 | **Women's Empowerment Cell (VISHAKHA)** | Co-ordinator : Mrs.Dr. Chochande R.U.<br>Mrs. Swami S. M. |
| 03 | **Examination Committee** | Co-ordinator : Dr. Surwase K. R.<br>Dr. Gadekar A. M.<br>Dr. Gawit S. D. |
| 04 | **Cultural Committee** | Co-ordinator : Dr. Gadekar A. M.<br>Dr. Gawit S. D.<br>Dr. Birajdar A. P.<br>Mrs.Dr. Chochande R.U. |
| 05 | **N.S.S. Advisory Committee** | Co-ordinator : Dr. Munde S. E.<br>Members : Mr. Lomte K. A.<br>Mrs.Dr. Chochande R. U.<br>Dr. Surwase K. R.<br>Dr. Gadekar A. M.<br>Dr. Patil A. C.<br>Dr. More P. M. |

| No. | Name of the Committee | Chairman / Members |
| --- | --- | --- |
| 06 | **Anti-Ragging Cell** | Co-ordinator : Dr. Munde S. E.<br>Members : Dr. Surwase K. R.<br>Mrs.Dr. Chochande R.U.<br>Mr. Jagtap K. S. |
| 07 | **Educational Industrial Tour Committee** | Co-ordinator : Dr. Kamble S. D.<br>Members : Dr. Gawit S. D.<br>Dr. Jawale B. H.<br>Mrs.Dr. Chochande R.U.<br>Dr. Yellure M. A.<br>Dr. Birajdar A.P. |
| 08 | **Competitive Examination Guidance Center** | Co-ordinator : Dr. More P. M.<br>Members : Mr. Lomte K. A.<br>Dr. Mane Y. D.<br>Dr. Mungle S.D.<br>Dr. Yellure M. A. |
| 09 | **Admission Committee** | Co-ordinator : Dr. Surwase K. R.<br>Members : Dr. Munde S. E.<br>Dr. Yellure M. A.<br>Dr. Birajdar A. P.<br>Mrs.Dr. Chochande R.U.<br>Dr. Jawale B. H.<br>Dr. Mungle S.D.<br>Dr. Kharade R. M. |
| 10 | **Time - Table Committee** | Co-ordinator : Dr. Kharade R. M.<br>Members : Dr. More P. M.<br>Dr. Surwase K. R.<br>Mrs.Dr. Chochande R.U. |
| 11 | **Publication Committee** | Co-ordinator : Dr. Yellure M. A.<br>Members : Dr. Birajdar A. P.<br>Dr. Gawit S. D.<br>Dr. Mane Y. D.<br>Dr. Birajdar D. S. |

| No. | Name of the Committee | Chairman / Members |
|---|---|---|
| 12 | **Alumni Association** | Co-ordinator : Dr. Mungle S.D.<br>Members : Dr. Patil A. C.<br>Dr. Kharade R. M.<br>Dr. Biradar S. R.<br>Dr. Kamble S.D. |
| 13 | **Social Science Association** | Co-ordinator : Dr. Gadekar A. M.<br>Members : Dr. Munde S. E..<br>Mrs. Dr. Chochande R.U.<br>Dr. Gawit S. D. |
| 14 | **Science Association** | Co-ordinator : Dr. Jawale B. H.<br>Members : Dr. More P. M.<br>Dr. Kamble S. D.<br>Dr. Patange V. N.<br>Dr. Birajdar S. R. |
| 15 | **Language Association** | Co-ordinator : Dr. Surwase K. R.<br>Members : Mr. Lomte K. A.<br>Dr. Mungle S.D.<br>Dr. Yellure M. A. |
| 16 | **Library Advisory Committee** | Co-ordinator : Dr. Rede H. N.<br>Members : Dr. Mungle S. D.<br>Dr. Birajdar D. S.<br>Dr. Yellure M. A. |
| 17 | **GOI Scholarship Committee** | Co-ordinator : Dr. Surwase K. R.<br>Members : Dr. Munde S. E.<br>Dr. Kamble S. D.<br>Dr. Gawit S. D. |
| 18 | **Sports Committee** | Co-ordinator : Dr. Patil A. C.<br>Members : Dr. Birajdar D. S.<br>Mrs. Dr. Chochande R.U.<br>Dr. Yellure M. A. |

| No. | Name of the Committee | Chairman / Members |
|---|---|---|
| 19 | **Grievance Redressal Cell** | Co-ordinator : Dr. Munde S. E.<br>Members : Dr. Birajdar D. S.<br>Mrs. Dr. Chochande R. U.<br>Mrs. Swami S. M.<br>Mr. Jagtap K. S. |
| 20 | **Student's Council** | Co-ordinator : Dr. Mungle S. D.<br>Members : Dr. Munde S. E..<br>Dr. Patil A. C.<br>Mr. Lomte K. A.<br>Mrs. Dr. Chochande R. U. |
| 21 | **Research Committee** | Co-ordinator : Dr. Mane Y. D.<br>Members : Dr. Yellure M. A.<br>Dr. Birajdar S. R. |
| 22 | **Avishkar Committee** | Co-ordinator : Dr. Jawale B. H.<br>Members : Dr. Mr. More P. M.<br>Dr. Kamble S.D.<br>Dr. Birajdar A. P. |
| 23 | **Commerce Association** | Mr. Kale A. M. |
| 24 | **Career Katta and Placement Cell** | Co-ordinator : Dr. Mungle S. D.<br>Members : Dr. Lomte K. A.<br>Dr. More P. M. |
| 25 | **Award Committee** | Co-ordinator : Dr. Kharade R.M.<br>Members : Dr. Mane Y. D.<br>Dr. Mungle S. D. |
| 26 | **Remedial Teaching** | Co-ordinator : Dr. Mane Y. D.<br>Members : Dr. More P. M.<br>Mr. Lomte K. A. |
| 27 | **Feed Back Committee** | Co-ordinator : Dr. Jawale B. H.<br>Members : Dr. Gadekar A.M. |

| No. | Name of the Committee | Chairman / Members |
|---|---|---|
| **28** | **Committee for SC / ST** | Co-ordinator : Dr. Kamble S. D.<br>Members : Dr. Gawit S. D.<br>Dr. Surwase K. R.<br>Dr. Patil A. C. |
| **29** | **Minority Cell** | Co-ordinator : Dr. Birajdar D.S.<br>Members : Mr. Pathan N. A.<br>Dr. Patil A. C.<br>Dr. Yellure M. A. |
| **30** | **Internal Complaint Committee** | Co-ordinator : Dr. Munde S. E.<br>Members : Dr. Mungle S. D.<br>Mrs. Dr. Chochande R. U.<br>Dr. Jawale B. H. |
| **31** | **OBC Cell** | Co-ordinator : Mrs. Dr. Chochande R. U.<br>Members : Mr. Yellure M. A.<br>Dr. Birajdar A. P.<br>Dr. Patange V. N. |

# Certificate of Registration

This is to Certify that
Quality Management System of

## BHARAT SHIKSHAN SANSTHA'S ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE

MAKANI, TQ. LOHARA, DIST. OSMANABAD, MAHARASHTRA-413604, INDIA.

has been assessed and found to conform to the requirements of

## ISO 9001:2015

for the following scope :

PROVIDING GRADUATE LEVEL COURSES IN THE STREAMS OF ARTS, SCIENCE, COMMERCE. PROVIDING VOCATIONAL COURSES.

| | | | |
|---|---|---|---|
| Certificate No | : 22EQGU88 | | |
| Initial Registration Date | : 14/06/2022 | Issuance Date | : 14/06/2022 |
| Date of Expiry | : 13/06/2025 | | |
| 1st Surve. Due | : 14/05/2023 | 2nd Surve. Due | : 14/05/2024 |

EGAC Accredited
QMS Certification
CAB # 118005

Director

**Magnitude Management Services Pvt. Ltd.**
B-55, Lower Ground Floor, Sector 02, Noida-201301, U.P, India
e-mail: info@mmscertification.com, website: www.mmscertification.com

* Subject to Successful Surveillance Audit and case surveillance audit is not allowed to be conducted, this certificate shall be suspended/withdrawal.

Certificate Verification: Please Re-check the validity of certificate at http://www.mmscertificatio[illegible]eclients.aspx or www.mmscertification.com at Active Cli

Certificate is the property of Magnitude Management Services Pvt. Ltd and shall be [illegible] immediately when demanded

# VISION MISSION

## ◈ VISION ◈

To Impart Higher Education
In earthquake affected rural area.

## ◈ MISSION ◈

Spread of skill based Education in rural
Youth Inculcation of Values and
Overall Personality Development.